IJCRT.ORG ISSN : 2320-2882

INTERNATIONAL JOURNAL OF CREATIVE RESEARCH THOUGHTS (IJCRT)

An International Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# लोकभाषा आणि आदिवासी बोलींचे जतन व संवर्धन : एक निरीक्षण

**( विशेष संदर्भ : पावरा आणि भिलोरी बोली )**

**प्रा.डॉ अर्चना वैजनाथ घोडके**

**सहाय्यक प्राध्यापक (मराठी विभाग)**

**बिटको महाविद्यालय,नाशिक रोड, नाशिक ४२२१०१**

**गोषवारा :**

आदि+वासी या शब्दापासून 'आदिवासी'शब्दाची उत्पत्ती झालेली आहे. आदिपासून वास्तव्य करणारे असे आदिवासी समाजाची ओळख आपल्याला 'आदिवासी' या शब्दावरूनच स्पष्ट होते. हा समाज धर्मपूर्व आहे. ज्यावेळी कुठलीही जात, पात, धर्म, पंथ, नव्हते तेव्हापासून हे समूह संस्कृतीला पाया मानून जीवन जगत आहेत. त्यात समता,बंधुता,प्रेम,विश्वास,श्रम,समूहभावना, सहकार्य अशी मानवी जीवनमूल्याची व निसर्ग जतन, संवर्धनाची शिकवण आहे. परंतु भोगवादी, भांडवली व्यवस्थेने केलेल्या अतिक्रमणांनी त्यांच्या विकासात मोठी बाधा निर्माण केली आहे. असे असले तरी काही प्रमाणात का होईना हा समाज निसर्गसंस्कृतीचे, त्यांच्या भाषिक वैशिष्ट्यांचे जतन व संवर्धन करताना दिसतो. मात्र पाहिजे त्या मोठ्या प्रमाणात ते फारसे पाहवयास मिळत नाही. याचे उत्तम उदाहरण म्हणजे २०१९ च्या सर्वेक्षणानुसार मराठीच्या साठ बोली पैकी ४० बोली नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत व त्यात इतर बोलीप्रमाणेच पावरा आणि भिलोरी या दोन्ही बोलींचा अंतर्भाव असल्याचे नमूद करण्यात येते. आदिवासी समाज हा जगाच्या बहुतेक सर्वच भागात राहत असल्याने त्यांच्या सर्वच बोली जिवंत व प्रवाहित राहिल्या पाहिजेत. त्यांच्या बोलीचे जतन व संवर्धन होणे गरजेचे ठरते. पावरा आणि भिलोरी बोलींच्या लोकसंस्कृतीचा सामाजवैज्ञानिक दृष्टीकोनातून अभ्यास केला गेला तर तो अंत्यत परिणामकारक ठरेल याच उद्देशाने निरीक्षणाच्या माध्यमातून हा अल्पसा प्रयत्न केला आहे.

❖ **बीजशब्द :**

लोकभाषा, लोकसंस्कृती, जीवनमूल्य, सामाजवैज्ञानिक, लोकपरंपरा, मौखिक साहित्य, निसर्गपूजन, वसाहत, आंतरविद्याशाखीय, बोली, वस्तुधन, शब्दधन, भांडार, लघुक्षेत्र, भौगोलिकता, व्यापकता इत्यादी.

❖ **प्रस्तावना** :

महाराष्ट्र ,गुजरात, मध्यप्रदेशच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर आदिवासी लोकांची वसाहत आहे. सातपुडा पर्वत, तापी-नर्मदेच्या आश्रयात भिल्ल समाज वास्तव्यास आहे. ह्याच परिसरात आदिवासी पावरा आणि भिलोरी समाजही मोठ्या प्रमाणावर वास्तव्यास आहे. निसर्गपूजन हे या जमातीचे मुख्य वैशिट्ये आहे. विशेषतः ह्या समाजाला लोकपरंपरा, मौखिक साहित्य आणि जीवनमूल्यांची समृद्ध अशी संस्कृती आहे. असे असूनही ह्या समाजाची स्वतंत्र ओळख अजूनही उजेडात नाही हि वास्तविकता आहे. परिणामी साहित्यानिर्मितीही नाही. मात्र असे असले तरी ह्या बोली भाषेचे सर्व निकष पूर्ण करतात. त्या एक समग्र,सुव्यवस्थित व विस्मृत अश्या बोली आहेत.त्यांचे स्वतःचे स्वतंत्र व्याकरणशास्त्र व उच्चारण प्रक्रिया आहे. त्यांचा स्वतःचा वेगळा अर्थपूर्ण शब्दसंग्रह आहे. त्यांना मोठी परंपरा आहे. त्या प्रगल्भ जिवंतबोली भाषा आहेत. शिवाय जगातील इतर बोलीभाषाप्रमाणे त्यांना विशेष सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ आहे. त्यांच्यावर स्थानपरत्त्वे व आजूबाजूच्या इतर भाषांचा प्रभाव देखील पडला आहे.

❖ **आंतरविद्याशाखीय उपयुक्तता :**

प्रस्तुत विषयाशी निगडीत राष्ट्रीय आणि आंतर राष्ट्रीय स्तरावरील संशोधनाचे प्रमाण अत्यल्प आहे. नव्हे ते अपवादानेच आढळेल. काही भाषामीमांसकांनी, भाषाअभ्यासकांनी केलेले लेखन कार्य उपलब्ध आहे परंतु ते पुरेसे नाही. गोंडी व भिल्ल भाषेवर असलेले लेखन मर्यादितच आढळते. सध्या आदिवासी जमातीतील वारली, भिल्ल, पावरी, मावची, निहाली, परधान, गोंडी, कोलामी, कोरकू आणि कातकरी या भाषांवर टप्प्याटप्प्याने काम केले जात आहे. असे असले तरी आदिवासींचे स्वावलंबीपण आणि समाजाची, संस्कृतीची असलेले नाळ वेगाने नष्ट होण्याच्या वाटेवर आहे. याविषयावर चिंतन होणे गरजेचे आहे. बोलीभाषा जिवंत असतील तरच लोकसाहित्य, संस्कृती आणि इतिहास जतन होईल असे वाटते. त्यामुळे त्या दृष्टीकोनातून प्रयन्त केले गेले पाहिजे. बोली संपली म्हणजे त्या बोली बरोबर त्या समाजाची रूढी, परंपरा, इतिहास, साहित्याशोध, पूर्णसभ्यता नष्ट होऊन जाते. हे लक्षात घ्यायला हवे. याचे उत्तम उदाहरण म्हणून 'बो' बोलींचे उदाहरण घेता येते. ही बोली भारतीय उपखंडाच्या अंदमान-निकोबार द्विपातली होती. ही बोली बोलणाऱ्या ८५ वर्षाच्या बोआताईचे ५ फेब्रुवारी २०१० साली निधन झाले. पासष्ट सहत्र वर्षांपासून बोलली जाणारी 'बो' बोली तिच्यासोबत मातीत मिसळून गेली. किती मोठे दुर्दैव आहे! वेळीच या बोलीचे जतन केले असते तर त्या बोलीतील विशेषता, जीवनव्यवहार, जीवनमूल्य पुढच्या पिढीला सुपूर्द करता आले असते. अशा अनेक बोली भाषांची दखल घेतली गेली नाही त्यामुळे त्या नाहीशा झाल्या. याचे गांभीर्य लक्षात घेतले गेले पाहिजे.

❖ **बोलीचा इतिहास :**

भारतात सुमारे दीड हजारांवर बोली बोलल्या जातात. २०११ च्या जनगणने नुसार १३६८ मातृभाषांची नोंदणी झाली होती. परंतु भाषांचे वर्गीकरण करून फक्त १२१ भाषा असल्याचे आढळते. बोलीभाषेचा हा इतिहास पाहता आज मोठ्या प्रमाणावर बोलीभाषा नष्ट होताना दिसताहेत.विशेषतः आदिवासी जमातीच्या बाबतीत तर हे अधिक तीव्रतेने दिसून येते. समाजाच्या व संस्कृतीच्या दृष्टीने आज ही एक गंभीर समस्या बनली आहे. कारण भाषेचा अंत म्हणजे समाजाचा व संस्कृतीचा अंत असतो. आज आपण अनेक बोली भाषा गमावण्याच्या टप्प्यावर येऊन पोहचलोत. त्यात प्रामुख्याने सामाजिक जडणघडण आणि आदिवासी समाजाचे प्रश्न सोडवण्यासाठी चिकित्सक आणि अभ्यासू पाया घडवण्याचा अभाव दिसतो. मुलांना अभ्यासक्रमात मातृभाषेचा अभाव, बोलीभाषेवर असलेले मर्यादित लेखन, आदिवासी जनजीवन, संस्कृती, मूल्यता ,पारंपरिकज्ञान यासंबधीचे लेखन साहित्य म्हणावे तसे उपलब्ध नाही. परिणामी बोलीभाषेला जिवंत व प्रवाही ठेवण्यासाठी, तिचे अस्तित्व कायम टिकवून ठेवण्यसाठी, तिचे जतन व संवर्धन करणे हे वरील विषयाच्या अनुषंगाने अधिक उपयुक्त ठरणार असेल.

❖ **उद्दिष्टे :**

१. पावरा आणि भिलोरी या आदिवासी बोलीच्या अभ्यासातून उच्चारनातील भेद, स्वतंत्र भाषिक भेद व तिचे असणारे स्वतंत्र अस्तित्व याचा शोध घेता येईल.

२. प्रस्तुत अभ्यासाच्या निमित्ताने पावरा आणि भिलोरी बोलीतील शब्दधन, वस्तुधन व उच्चारण यांचे संकलन, संवर्धन करता येईल.

३. इंग्रजी भाषा व इतर यांत्रिकीकरणामुळे आदिवासी बोलीभाषा नष्ट होण्याची निर्माण झालेली भीती काही प्रमाणात कमी करता येईल.

४. बोली अभ्यासामुळे पावरा आणि भिलोरी या आदिवासी समाजातील वेगळेपण समजण्यास मदत होईल.

५. या बोलीभाषामुळे समाजाच्या चालीरीती, रूढी-परंपरा, सण-उत्सव,प्राचीनता,भौगोलिकता समजण्यास मदत होईल.

६.या बोलींच्या माध्यमातून सामाजभाषाविज्ञान व आधुनिक अभ्यासशाखेतील भांडार व लघुक्षेत्र या संकल्पना सिध्द करता येईल.

७. आदिवासी जमातीतील पावरा व भिलोरी समाजाने स्वतःच्या बोलीभाषेतून व्यक्त केलेले लिखित व अलिखित साहित्याचा मागोवा घेता येईल.

❖ **गृहितके :**

१.पावरा आणि भिलोरी बोलीचे शब्दसंग्रह, उच्चारणाचा विशिष्ट हेल, व्याकरणिक विशेष, भिन्न भिन्न रूप इत्यादी दृष्टीने तिचे असणारे वेगळेपण स्पष्ट होईल.

२. पावरा आणि भिलोरी बोलीमधील लोकगीते, दंतकथा, म्हणी, उखाणे, वाकप्रचार इत्यादी लोकसाहित्याच्या आधारे बोलीभाषेचा अभ्यास उपयुक्त ठरेल.

३.पावरा आणि भिलोरी बोलीमध्ये समाजातील इतर परिवर्तनामुळे झालेले बदल नोंदवता येतील.

४. पावरा,भिलोरी आणि मराठी भाषा यामध्ये असलेला फरक तपासता येईल.

५. आदिवासी जमातीच्या समृध्द आणि झपाट्याने कमी होत चाललेल्या सांकृतिक वारसाचे जतन करणे काळाची गरज आहे हे नोंदवता येईल.

६. पावरा आणि भिलोरी बोलीचा सामाजिक, सांकृतिक, भौगोलिक व भाषिकदृष्ट्या समाजभाषा वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास करता येईल.

७. बोलीभाषेच्या माध्यमातून आदिवासीचे सामाजिक, सांकृतिक जीवन, रिती-रिवाज, सन -उत्सव, चालीरीती या सगळयांचा बोलीवर झालेला परिणाम अभ्यासता येईल.

८. जागतिकीकरणामुळे, आधुनिकीकरणामुळे पावरा आणि भिलोरी समाज बोलीवर इतर भाषेचा प्रभाव कसा झाला ते नोंदवता येईल.

९. आदिवासींची स्वतंत्र अशी स्वतःची बोलीभाषा असल्याने या जमातींनी त्याद्वारे आपली संस्कृती जतन करून बोली साहित्याला समृद्ध बनविले आहे. यादृष्टीने पावरा आणि भिलोरी बोलीभाषेत असलेल्या साहित्याचा आढावा घेता येईल.

❖ **भौगोलिक क्षेत्र :**

महाराष्ट्राच्या विस्तृत प्रदेशात पसरलेला व महाराष्ट्राच्या बाहेर स्थानिक झालेला आदिवासी समूहाचे क्षेत्र प्रदीर्घ आहे. पावरा आणि भिलोरी समाजाच्या बोलीचे स्वरूप वैशिष्ट्यपूर्ण अशा भौगोलिक आकाराने, सीमावर्ती प्रदेशाने संपन्न झालेले आहे. जीवनाविषयीचा अत्त्यंत विमुक्त अविष्कार आणि अर्थाचा अत्यंत थेट निर्भीड अविष्कार करणारी रूपे त्यामधून व्यक्त होत आली आहेत. बदलत्या गतिमान काळातही आपल्या सामाजिक, सांस्कृतिक व भाषिक अस्तित्वाच्या खुणा या बोलीभाषेत मोठ्या प्रमाणात आहेत. या दृष्टीकोनातून धुळे, नंदुरबार त्यामधील काही-काही तालुक्यातील, गावातील बोलल्या जाणाऱ्या या बोलीचा रुपदृष्ट्या विचार ही या अभ्यासविषयाची व्यापकता असेल. कारण प्रत्येक समजानुसार भाषा वापराचे संकेत बदलतात. मानवी भाषा व्यवहाराचे जेवढे व्यापक स्वरूप अनुभवास येतील तेवढे या अभ्यास पद्धतीचे स्वरूप व्यापक होत जाईल. कारण कोणताही समाज कायम स्थिर नसतो. बोलीवर प्रत्यक्ष- अप्रत्यक्ष समाजाचे प्रतिबिंब पडलेले असते. व्यक्तीला सामाजिकीकरणाच्या प्रक्रियेतूनच भाषा, बोली प्राप्त होते. आणि ती समाजाच्या सर्व विशेष संदर्भासहित प्राप्त होते. त्यामुळे प्रत्येकाच्या भाषा वापरावर समाजाचा अंतर्गत भेदाचे परिणाम जाणवतात. त्यामुळे ते अधोरेखित होणे आवश्यक आहे. यातूनच तिच्या परिवर्तनाचा शोध व वेध घेता येतो.

पावरा आणि भिलोरी जमातीतील लोक सातपुड्याच्या खास करून धुळे, नंदुरबार जिल्ह्यात पायथ्याकडील प्रदेशात राहतात. महाराष्ट्र, गुजरात व मध्यप्रदेश ह्या राज्यात हा समाज विखुरलेला असून तेथील भौगोलिक परिसर, पर्यावरण व आजूबाजूला असणाऱ्या इतर सामाजासोबतचे सान्निध्य यामुळे त्यांच्यात काही प्रमाणात विविधता आढळते. त्यामुळे प्रत्येक जिल्ह्यातील तालुके व त्या तालुक्यातील आसपासच्या खेड्यागावामध्ये जाऊन प्रत्यक्ष बोलीचे, सर्वेक्षण, निरीक्षण व परीक्षण करून बोलीभाषेचे भाषिक दृष्ट्या संकलन केले गेले पाहिजे. सूक्ष्म अभ्यासासाठी प्रत्यक्ष त्या व्यक्तीच्या तोंडी उच्चारणानुसार रेकॉर्डिंग केले गेले पाहिजे. त्यानंतर त्याचे वर्गीकरण, विश्लेषण करून त्याची समाजभाषावैज्ञानिक पद्धतीने मांडणी केली गेली पाहिजे. अशा पद्धतीने लोकभाषेचे जतन करणे भाषिकदृष्ट्या उपयुक्त ठरणारे आहे.

❖ **विषयातील नावीन्यता :**

आदिवासी समाजाची शिक्षणाची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. विशेषत: ग्रामीण भागातील सरकारी शिक्षणाची अवस्था तर अधिक चिंताजनक आहे. साधनांबरोबरच इच्छाशक्तीचाही अभाव मोठ्या प्रमाणावर आहे.परिणामी लोकसमाज आजही शिक्षणाच्या नवप्रवाहाच्या काहीसा मागे पडला आहे. त्यामुळे या शोध निबंधाच्या निमित्ताने यावर प्रकाश टाकण्याचे काम या माध्यमातून करता येईल. याशिवाय आदिवासी पाड्यांवरील शिक्षणाची अवस्था वाईट आहे. आदिवासी विद्यार्थ्यांना आपल्या बोलीभाषेतील लेखन उपलब्ध झाल्यास,समाज-संस्कृतीची आपल्या बोलीभाषेतून ओळख झाल्यास, नवीन आदिवासी पिढी शिक्षणाकडे आकर्षित होईल. हे मोठे आव्हान असेल पण त्याच बरोबर ती एक सुवर्णसंधीही असेल. मातृभाषेतून शिक्षण देणे ही काळाची गरज आहे पण आदिवासी मुलांची मातृभाषाच वेगळी असल्याने त्यांना मराठी अपरिचित वाटते. बोलीभाषेत शिक्षण नाही म्हणून विद्यार्थ्यांचे शाळेतील गळतीचे प्रमाण वाढले. विविध बोलीभाषा या संस्कृती शब्दकोशाच्या तसेच भाषा कोशाच्या माध्यमातून जतन करायला हव्यात. असा कोश करणे हे आवश्यक ठरेल असे निश्चितपणे म्हणता येते.

❖ **समारोप :**

मराठी भाषिक किंवा इतर भाषिकांना आदिवासी समाजातील पावरा व भिलोरी या बोलीभाषा फारशा समजत नाहीत. यानिमित्ताने ही भाषा आपणास आत्मसात करता येईल. तिची व्याकरण व्यवस्था समजून घेता येईल. तिच्यातील मराठीशी असणारा संबंध, साम्य-भेद लक्षात येईल आणि प्रामुख्याने तिच्या समाज, संस्कृतीची व साहित्याची देवाण घेवाण झाल्यास त्या बोली नामशेष होण्यापासून वाचतील. भाषा आणि बोली यातील महत्वाचा दुवा म्हणून संदेशन फार महत्वाचे कार्य करत असते.भाषा ही मानवनिर्मित संदेशन संस्था असल्यामुळे सर्वच मानवी व्यवहार प्रकट-अप्रकट भाषेद्वारे साध्य होतात. आपण जो व्यवहार करतो तो या नियमव्यवस्थेचा वापर करून करतो. येथे भाषेच्या व बोलीच्या कार्याचा विचार अपेक्षित आहे. भाषेतून ज्ञान, माहिती, विचार, भावना, स्वप्ने, अभिरुची याची देवाणघेवाण करता येते. यामुळे माझ्या दृष्टीकोनातून असा अभ्यास होणे अत्यंत निकडीचे ठरते.

❖ **संदर्भग्रंथ:**


१. नारायण लाळे (संपा), ‘महाराष्ट्रातील बोलीभाषा विशेषांक’, साहित्य: दिवाळी विशेष अंक २०२१, मुंबई मराठी साहित्य संघाचे त्रैमासिक.

२. डॉ. गणेश देवी, ‘भाषा विविधतेची मशागत’,बोलीभाषा विशेषांक, पृ.०३

३. संतोष पावरा, आदिवासी पावरा समाज आणि पावरी बोलीबाषा, बोलीभाषा विशेषांक ,पृ.१४३

४. डॉ. शिव कुमार सोनाळकर, (संपा) शिवम संशोधन पत्रिका, (बोली विशेषांक) शिवाजी विद्यापीठ, मराठी विशेष संघ, कोल्हापूर,पृ.१६

५. ना.गो.कालेकर, भाषा आणि संस्कृती, मौजे प्रकाशन गृह, मुंबई, पृ .११०

६. डॉ.म.सु.पगारे व डॉ.आशुतोष पाटील (संपा), बोलीभाषा संशोधनाच्या नव्या दिशा, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव.

७. डॉ. वसंत स.जोशी (संपा), ‘भाषा व साहित्य संशोधन’ (खंड पहिला ) महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे.